नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ५५ Issue - 55 | वार शनिवार दि. १२ जुलै २०२५ Blow- Saturday Date 12 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यात पशुपालन व्यवसायाला कृषी व्यवसायाचा दर्जा

### असा निर्णय घेणारे देशातील महाराष्ट्र पहिले राज्य; ग्रामीण उद्योजक तयार होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात पशुपालन व्यवसायास 'कृषी व्यवसायाचा' दर्जा देण्यात आला आहे. राज्यातील पशुपालन व्यवसायाला मोठा दिलासा देणारा हा निर्णय असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी हा क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ७६.४१ लक्ष पशुपालक कुटुंबांना होईल. या निर्णयामुळे पशुजन्य उत्पादनातून सुमारे ७,७०० कोटी रुपये इतकी वाढ अभिप्रेत आहे, असे पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले,



या निर्णयानुसार राज्यातील वीज दर आकारणी, कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्याकरिता कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते त्याच दराने कर आकारणी करण्यात येईल. पशुपालन व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या खेळत्या भागभांडवलासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जासाठी पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेच्या धर्तीवर व इतर प्रयोजनासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याज दरात ४ टक्के पर्यंत सवलत देण्यात येईल व त्यासाठी स्वयंस्पष्ट मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती विहित करण्यात येईल आणि कृषी प्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यात येईल, असे मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले,

राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के आहे. कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के आहे. राज्यातील पशुजन्य उत्पन्नाचा विचार करता भारतीय आरोग्य परिषदेने दैनंदिन आहारात शिफारस केलेल्या प्रमाणाइतके अंडी व मांस उपलब्ध नाही. तसेच दुग्ध उत्पादनात राज्यातील पशुधनाची उत्पादन क्षमता इतर राज्यांच्या तुलनेत कमी आहे. याशिवाय निती आयोगाच्या सन २०२१ च्या अहवालामध्ये पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पद्धतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असून त्यावर उपाययोजना करुन शेतकरी /पशुपालकांच्या आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली असल्याचेही पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले.

## राज्यातील प्रत्येक शेताला रस्त्यासाठी समग्र योजना आणणार : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. शेतात जाण्यासाठी, शेतमालाची ने-आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना शासन आणणार आहे. ही योजना संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांची मागणी पूर्ण करणारी असेल, ही योजना समग्र असण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेचा उत्तरात केली.

शेतरस्त्यांच्या बाबत सदस्य अभिमन्यू पवार यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेमध्ये सदस्य सर्वश्री विजय वडेट्टीवार, सुमित वानखेडे यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेत रस्त्यांच्या समग्र योजनांबाबत गठीत समिती एक महिन्याच्या आत शासनाला उपाययोजनांचा अहवाल सादर करेल. शेत रस्ते करताना कौशल्यावर आधारित काम असल्यास यासंबंधी असलेल्या योजनांच्या समन्वयातून करणे, तसेच अन्य योजनांचा निधी एकत्रित करीत शेतरस्ते पूर्ण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. गावांमधील रस्त्यांसाठी असलेल्या २५-१५ योजनेतील ५० टक्के निधी शेत रस्त्यांच्या निर्मितीसाठी उपयोगात आणण्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

या सूचनेच्या उत्तरात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेत रस्त्यांच्या प्रकरणांमध्ये अपील उपविभागीय अधिकाऱ्यांपर्यंत संपवण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येईल. वाटप पत्रात शेतकऱ्यांचा समावेश करणे, शेतरस्त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोक अदालती घेणे, रस्त्यांचे सपाटीकरण करणे, चालू वहिवाट रस्त्यांचे सर्वेक्षण, गाव नकाशात हे रस्ते घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यापुढे शेतरस्ता कमीत कमी १२ फूट रुंदीचा करण्यात येईल. जमाबंदी आयुक्त यांच्या माध्यमातून शेत रस्त्यांना क्रमांक देण्याची कार्यवाही करण्यात येईल. शेतरस्ते निर्मितीबाबत रोजगार हमी योजना, ग्रामविकास व महसूल विभाग यांच्याशी चर्चा करून स्वतंत्र लेखा शीर्ष निर्माण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. कालबद्ध कार्यक्रम राबवून शेत रस्ते पूर्ण करण्यात येतील, असेही महसूल मंत्री श्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

## ऊसतोड महिला कामगारांच्या समस्यांवर ठोस उपाययोजना कराव्यात : विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

मुंबई : ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य, सुरक्षा आणि सामाजिक संरक्षणाच्या समस्या तातडीने मार्गी लावाव्यात, असे निर्देश विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले. विधानभवन येथे झालेल्या बैठकीस आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, बीडचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. ए. बी. राऊत, सहसंचालक पुणे, डॉ. दिगंबर कानगुळे, लातूरचे आरोग्य उपसंचालक, डॉ. भोसले, बीडचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ आणि माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. सचिन रोकडे यांच्यासह कामगार विभागाच्या कक्ष अधिकारी श्रीमती दीपाली जपे उपस्थित होत्या. साखर आयुक्त दीपक रावते हे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.



ऊसतोड कामगारांसाठी स्वतंत्र कायद्याच्या अनुषंगाने या बैठकीत चर्चा झाली. बैठकीत ऊसतोडणी कामगार महिलांचे आरोग्य, विशेषतः गर्भाशय काढण्याच्या वाढत्या घटनांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियेसंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक यांची पूर्वपरवानगी बंधनकारक आहे, असे डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात आरोग्यविषयक डेटा संकलन, तपासणी प्रक्रिया आणि जनजागृती वाढवणे अत्यावश्यक आहे.

डॉ. विजय कंदेवाड म्हणाले, सर्वेक्षणात गर्भवती मातांची तपासणी, बालकांचे लसीकरण आणि आवश्यक असल्यास खासगी रुग्णालयात उपचार हे सर्व समाविष्ट केले जात आहेत. गर्भाशय काढण्याच्या घटनांवर अधिक लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र माहिती गोळा केली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्राने रोजगार हमी कायदा व माहिती अधिकार कायद्यासारख्या महत्त्वाच्या निर्णयांमध्ये नेतृत्व केले असून, ऊसतोड मजुरांच्या प्रश्नातही अशीच सकारात्मक दिशा आवश्यक आहे. सर्व विभागांनी एकत्र येऊन यासंदर्भातील कार्यवाहीला गती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

## जनसुरक्षा कायदा राजकीय हेतूने प्रेरित : उद्धव ठाकरे

मुंबई : नक्षलवाद आणि दहशतवादाला बिमोड करण्यासाठी राज्य सरकारकडून जनसुरक्षा विधेयक विधीमंडळात दाखल करण्यात आलं. विधानसभेत काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विधेयकाचं वाचन केलं. यानंतर बहुमताने हे विधेयक मंजूर करण्यात आलं. यानंतर विधान परिषदेत आज जनसुरक्षा विधेयक मांडण्यात आलं. यावेळी विरोधकांनी जोरदार विरोध केला. या मुद्द्यावरुन सभागृहात गोंधळ बघायला मिळाला. अखेर विरोधकांनी विरोध म्हणून सभात्याग केला. त्यानंतर विधान परिषदेत बहुमताने जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यात आलं. यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी विधान भवनात माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी जनसुरक्षा कायद्यावरुन राज्य सरकारवर टीका केली.

काल आणि आज विधीमंडळात जनसुरक्षा या नावाने एक कायदा आणला जातोय. काल विधानसभेत बहुमताचा जोरावर तो मंजूर करण्यात आला. साहजिकच आहे, सत्ताधारी पक्षाकडे पाशवी बहुमत आहे. त्याचा ते दुरुपयोग करत आहेत. आमचा या विधेयकाला नेमका विरोध का आहे? आमच्याकडून सदस्य बोलले, त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं आहे की, सरकार सांगताना सांगत आहे की, नक्षलवाद आणि दहशतवादाचा बिमोड करायचा आहे. या बिलामध्ये नक्षलवाद आणि दहशतवाद असे शब्द कुठेही नाहीत. सुरुवातीला फक्त कडवी डावी विचारसरणी असं लिहिलं आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.



कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना लिहिलं आहे. डाव्या आणि उजवा याच्यातील फरक आपल्याला करण्याची आवश्यकता आहे. साधारणपणे शिवसेना आणि भाजप आम्ही सोबत होतो. त्यावेळेला आम्हाला उजव्या विचारसरणीचे म्हणायचे. कारण आम्ही आहोत. कारण आम्ही धर्म माणणारे आहोत, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

खरंतर डावे आणि उजवे करण्याची गरज नाही. आपल्या संविधानात सर्वसमावेशकता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील सब का साथ आणि सब का विकास म्हटलं आहे. त्यामुळे उजवा आणि डावा हा फरक कळत नाहीय. देशविघातक शक्तींचा बिमोड करायचा असेल तर आम्हाला विचारायची गरज नाही. आम्हीदेखील सरकारच्या सोबत आहोत आणि राहणार, त्याबद्दल दुमत नाही. पण तुम्ही राजकीय हेतून प्रेरित बिल आणत असाल, तसा त्याला वास येतोय, कारण बिलात कुठेही नक्षलवाद वगैरे शब्दच नाहीय, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला.

बेकायदेशीर कृत्य याचा अर्थ एकद्या व्यक्तीने किंवा संघटनेने केलेले सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था यास धोका निर्माण केल्यास किंवा सार्वजनिक सुव्यस्थेत हस्तक्षेप करण्याचा कल आहे असे किंवा वगैरे वगैरे म्हटलं आहे. यामध्ये कुठेही दहशतवाद, नक्षलवाद शब्द नाहीत. याचाच अर्थ ते सर्वसामान्य जनतेलाही कधीही कुठेही उचलून तुरुंगात टाकू शकतात. पूर्वी जसा मिसा, टाडा कायदा होता, तसाच आता जनसुरक्षा कायदा आणलेला आहे. मला असं वाटतं याचं नाव जनसुरक्षा ऐवजी भाजपा सुरक्षा कायदा असायला हवं. कारण भाजप विरोधात जो बोलेल तो देशद्रोही आहे, असा हा कायदा आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

आम्ही त्यांना सांगितलं की, संबंधित बिलमध्ये नक्षलवादी हे शब्द आणा. या कायदाचा दुरुपयोग होईल. कारण तसं चित्र मला विधान परिषदेत दिसलं. या बिलाचा राजकीय दुरुपयोग केला जाईल, असा आमचा समज आहे. या कायद्यात सुधारणा करा आणि पाठिंबा देतो, असं सांगितलं, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली.

### ईपीएफओ खातेदारांसाठी गुड न्यूज

### कोट्यवधी सदस्यांना फायदा

## २०२४-२५ साठी ८.२५ टक्के व्याज खातेदारांच्या खात्यात वर्ग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय श्रममंत्री मनसुख मांडवीय यांनी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना या आठवड्यात ईपीएफओ खातेदारांच्या खात्यात व्याजाची रक्कम वर्ग केली आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ८.२५ टक्के व्याज खातेदारांच्या खात्यात वर्ग केली जाणार आहे. ही प्रक्रिया आठवड्यात पूर्ण होईल, अशी माहिती केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांनी दिली. यामुळं देशातील ३३.५६ कोटी खात्यांमध्ये व्याज वर्ग केलं जाईल.

ईपीएफओकडून दरवर्षी खातेदारांच्या खात्यात व्याज वर्ग केलं जातं. केंद्र सरकारकडून ईपीएफओच्या खातेदारांना किती टक्के व्याज द्यायचं याबाबतच्या शिफारशीला मंजुरी दिली जाते. त्यानंतर कर्मचाऱ्यांच्या पीएफ खात्यात व्याज वर्ग केलं जातं.

आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी केंद्र सरकारनं ८.२५ टक्के दराला २२ मे २०२५ ला मंजुरी दिली आहे. त्यानंतर ६ जूनपासून ईपीएएफओकडून वार्षिक व्याज जमा करण्यासंदर्भातील प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. या वर्षातील वार्षिक खाते अपडेशनची प्रक्रिया १३.८८ लाख नियोक्त्यांसाठी आणि ३३.५६ कोटी सदस्य खात्यांची पूर्ण झाली आहे. ही आकडेवारी ८ जुलैपर्यंतची आहे. १३.८६ लाख नियोक्त्यांकडील ३२.३९ कोटी खात्यांमध्ये ८ जुलैपर्यंत व्याज जमा करण्यात आलं आहे. ईपीएफओ नियोक्त्यांची वार्षिक खात्यांच्या अपडेशनची प्रक्रिया ९९.९ टक्के आणि ९६.५१ सदस्य खात्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.



मनसुख मांडवीय यांनी आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये व्याज जमा करण्याची प्रक्रिया ऑगस्टमध्ये सुरु झाली होती. व्याज जमा करण्याची प्रक्रिया डिसेंबरमध्ये पूर्ण झाली होती.यंत्रणेतील ऑप्टिमायझेशनमुळं या वर्षी व्याज जमा करण्यासंदर्भातील महत्त्वाची प्रक्रिया जूनमध्येच बऱ्यापैकी पूर्ण झाल्याचं मनसुख मांडवीय म्हणाले.

मनसुख मांडवीय यांनी म्हटलं राहिलेल्या खात्यांमध्ये व्याज येत्या आठ दिवसांमध्ये जमा केलं जाणार आहे. आर्थिक वर्ष २०२५ साठी व्याज ८.२५ टक्क्यांनी जमा केलं जाईल. केंद्र सरकारनं ईपीएफओकडून करण्यात आलेल्या शिफारशीला मान्यता देत घेण्यात आला होता. ईपीएफओच्या केंद्रीय बोर्डाची २३७ वी बैठक २८ फेब्रुवारी रोजी नवी दिल्लीत पार पडली होती. त्या बैठकीचं अध्यक्षपद मनसुख मांडवीय यांनी भूषवलं होतं.त्यानंतर वित्त मंत्रालयाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवण्यात आला होता.

आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये ईपीएफओनं ८.१५ टक्के व्याज दिलं होतं. त्यामध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ०.१० टक्क्यांची वाढ करण्यात आली होती.

आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये ईपीएफओनं ८.१५ टक्के व्याज दिलं होतं. त्यामध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ०.१० टक्क्यांची वाढ करण्यात आली होती.

ईपीएफओनं आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ८.१० टक्के व्याज दिलं होतं. त्यापूर्वी २०२१-२२ मध्ये ८.५ टक्के व्याज दिलं गेलं होतं. तर,१९७७-७८ मध्ये ८.१ टक्के व्याज देण्यात आलं होतं.

## आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या अनेक मागण्यास शासनाकडून निधीची तरतूद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला(प्रतिनिधी):-सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी राज्यातील शेतकऱ्यांना दूधासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाला प्रति लिटर १० रूपये अनुदान देण्यात यावी अशी मागणी पावसाळी अधिवेशनात केली असता राज्य सरकारने अनुदान देण्याचे मान्य केलेले असून आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश आले आहे. त्याचबरोबर सांगोला तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून ग्रामीण भागातील दळणवळण विस्कळीत झाल्याने आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी निधीची मागणी केलेली होती त्यास पुरवणी मागण्या मध्ये मंजुरी देण्यात आली आहे. सांगोला तालुक्यात डाळिंब व द्राक्ष या पिकांपासून वाईन तयार करून शेतकऱ्यांना चार पैसै ज्यादा मिळावेत या साठी या भागात वाईन उद्योग सुरू करावा अशी मागणी केली असता शासनाने त्यावर सकारात्मकता दर्शवली असून त्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील ६१ हजार ४६० हेक्टर जमिनीवर डाळींब पिकाचे उत्पादन घेतले जाते. राज्यात डाळींबाचा जिल्हा म्हणून सोलापूर जिल्ह्याची विशेष ओळख आहे. सोलापूर जिल्ह्यात केंद्रीय डाळींब संशोधन केंद्र मंजूर करून २००५ पासून कार्यान्वित आहे, परंतु संशोधन केंद्रामध्ये आजतागायत डाळींबाचे नवीन वाण निर्माण करण्याबाबत अपयशी ठरलेले आहे. तरी केंद्रीय डाळींब संशोधन केंद्रात नवीन डाळींब वाण निर्मिती करण्यासाठी शासनाने बीज परीक्षण प्रयोगशाळा बळकटीकरण करण्याकरिता आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी निधीची मागणी केली होती त्यास शासनाने मान्यता दिली असून लवकरच त्याकरिता निधी उपलब्ध होणार आहे. सध्या सांगोला शहरात भूमिगत गटाराचे काम सुरु असून त्यामुळे शहरातील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली असून त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी केली होती त्यास पुरवणी मागण्या मध्ये मंजुरी देण्यात आली आहे. सांगोला येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय हे भाडे तत्वावर असून याठिकाणी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाची प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी जागा उपलब्ध असून, प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी निधीची मागणी करण्यात आली होती त्यास मान्यता देण्यात आली आहे.



## संपादकीय....


### समग्र योजना

प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. शेतात जाण्यासाठी, शेतमालाची ने-आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना शासन आणणार आहे. ही योजना संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांची मागणी पूर्ण करणारी असेल, ही योजना समग्र असण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी नुकतीच केली. शेत रस्त्यांच्या समग्र योजनांबाबत गठीत समिती एक महिन्याच्या आत शासनाला उपाययोजनांचा अहवाल सादर करेल. शेत रस्ते करताना कौशल्यावर आधारित काम असल्यास यासंबंधी असलेल्या योजनांच्या समन्वयातून करणे, तसेच अन्य योजनांचा निधी एकत्रित करीत शेतरस्ते पूर्ण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. गावांमधील रस्त्यांसाठी असलेल्या २५- १५ योजने-तील ५० टक्के निधी शेत रस्त्यांच्या निर्मितीसाठी उपयोगात आणण्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

# सीना-माढा उपसा सिंचन योजना पाणी प्रश्नावर आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी मांडली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सीना-माढा उपसा सिंचन योजना ही माझ्या मतदारसंघातील हजारो शेतकऱ्यांसाठी एक आशेचा किरण ठरली असती, परंतु गेली २० वर्षे ही योजना केवळ कागदांपुरतीच मर्यादित आहे. २७ मे २००५ रोजी मंजूर झालेल्या या योजनेतून २४,५५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याचे उद्दिष्ट होते, मात्र आजपर्यंत केवळ १६,१५१ हेक्टर क्षेत्रालाच पाणी मिळू शकले आहे. ही स्थिती अतिशय गंभीर असून शेतकऱ्यांच्या आयुष्याशी खेळ करणारी आहे.



२० वर्षांपूर्वी बसवलेल्या मोटारी आता निष्क्रिय झाल्या असून, पाण्याचा पुरवठा अपेक्षित ४५०-५०० क्यूसेक्स ऐवजी केवळ ३०० क्यूसेक्सवर आला आहे. यामुळे शेतकरी वारंवार अडचणीत येत आहे. मातीखाली टाकलेल्या पाइपलाइनमध्ये वारंवार गळती होऊन पाणी वाया जात आहे.

आजच्या घडीला संपूर्ण मोटर्स बदलणे, ६ किमी रायझर लाईन जमिनीवरून नव्याने बांधणे, उर्वरित २३६ हेक्टर भू-संपादन तातडीने पूर्ण करणे आणि योजनेच्या तिसऱ्या टप्प्यासाठी प्रस्तावित सुप्रिमा त्वरित मंजूर करणे आवश्यक आहे.

या दिरंगाईचा परिणाम गावांवर होतो आहे. तुळशी गाव फक्त २३० मीटर पाइपलाइनअभावी कोरडं पडले असून, लग्नसारखे सामाजिक व्यवहार ठप्प आहेत. बावी गावाने २००४ साली १००% मतदान करूनसुद्धा आजही पाण्याची वाट पाहावी लागते आहे.

शेतकऱ्यांचे दुःख थांबवण्यासाठी, त्यांचं भविष्य अंधारमय होऊ नये यासाठी या योजनेच्या तिसऱ्या टप्प्यास मंजुरी मिळवून पाणी प्रत्यक्षात शेतापर्यंत पोहोचवणं हीच आमची ठाम आणि तातडीची मागणी आहे.




# कुक्कुटपालन व्यवसायातून आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हावे : पशुधन विकास अधिकारी डॉ. बोधनकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : शेतकऱ्यांसाठी शेती पूरक व्यवसाय म्हणून कुक्कुट पालन हा खूप चांगला व्यवसाय आहे. हा व्यवसाय रोख रक्कम देणारा असल्याने याचा शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या खूप फायदा होतो. तसेच जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकानुसार या व्यवसायातून प्राणीजन्य पदार्थ, अंडी व मांस हे मोठ्या प्रमाणात उत्पादित होते. तरी सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी या प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष कृतीत आणून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहन पशुधन विकास अधिकारी डॉक्टर स्नेहंका बोधनकर यांनी केले.

## कुक्कुट पालन प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण संपन्न

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभाग अंतर्गत सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर येथे कुक्कुटपालन प्रशिक्षणाची तुकडी क्र. २ चे पशुधन विकास अधिकारी डॉ. स्नेहंका बोधनकर यांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे, त्याप्रसंगीत या मार्गदर्शन करत होत्या.

प्रशिक्षणार्थीमधून. सौ. वनिता रणे, रा. ब्रह्मपुरी, ता. मंगळवेढा व श्री. सुरज कुचेकर, रा. सावळेश्वर ता. मोहोळ यांनी सदर प्रशिक्षण हे भविष्यात स्वयंरोजगार व लघु उद्योग उभारणीसाठी पूरक माहीती व ज्ञान मिळाल्याबद्दल आभार व्यक्त केले. सदर प्रशिक्षणाची तुकडी दि. ०७ जुलै २०२५ ते ११ जुलै २०२५ या कालावधीत संपन्न झालेली असून सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. जमादार यांनी परिश्रम घेतलेले आहेत. तरी पुढील तुकडीस जिल्ह्यातील पशुपालकांनी तसेच सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी नोंदणी करून लाभ घ्यावा असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सहाय्यक पशुधन विकास अधिकारी एस. पी. माने यांनी केले.

# दिवंगत रत्नाकर (तात्या) मखरेंनी गोरगरिबांचा नगराध्यक्ष होण्याचा बहुमान मिळवला : हर्षवर्धन पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी: अतुल सोनकांबळे : दिवंगत रत्नाकर (तात्या)मखरेंनी आयुष्यात खडतर परिस्थितीवर मात करत संघर्षातून, सामाजिक चळवळीतून नगरपालिकेत नगरसेवक ते नगराध्यक्षपदाची कारकिर्दीत शहरातील उपेक्षित, वंचित व गोरगरीब नागरिकांचे प्रश्न सोडवणुकीसाठी सातत्याने न्यायाची भूमिका मांडली म्हणूनच गोरगरिबांचे नगराध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना मिळवता आला असे गौरवद्गार कार्यक्रमाचे उद्घाटक व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी काढले.




ते दिवंगत रत्नाकर मखरे यांच्या जन्मदिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शहरातील गरजू, मोलमजुरी करणाऱ्या महिला, विधवा, परितक्त्या महिलांना मोफत साडी वाटप कार्यक्रमात बोलत होते.

इंदापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने व्यंकटेशनगर येथे इंदापूर शहरातील विविध भागातील महिलांना १००० मोफत साडी वाटप करण्यात आले. मान्यवरांचा आयोजकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राज्य सरचिटणीस व प्रवक्ते ड.राहुल मखरे यांनी केले.

यावेळी नानासाहेब चव्हाण, ड. इनायत काझी,नितीन शिंदे, ड. तेजसिंह पाटील यांची भाषणं झाली झाली.

जगन्नाथ(बापू)शेवाळे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की,फुले,शाहू,आंबेडकरांना देखील त्या काळात प्रतिगाम्यांच्या विरोधात दीर्घकाळ लढा द्यावा लागला, संघर्ष करावा लागला. त्यांच्या प्रदीर्घ संघर्षामुळे पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र उदयास आला.दिवंगत रत्नाकर मखरे जीवनभर फुले,शाहू, आंबेडकरांच्या विचारधारेवर ठाम राहिले.म्हणूनच त्याचं नेतृत्व बहरलं. फुले,शाहू,आंबेडकरांचे विचार युवा पिढीसह येणाऱ्या पिढ्यांना देण्याची गरज आहे.तरच खऱ्या अर्थाने फुले,शाहू,आंबेडकरांचा महाराष्ट्र घडेल. असा विश्वास आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केला.दिवंगत रत्नाकर मखरेंच्या जीवनकार्याचा माघोवा घेत आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमास जिल्हा युवक अध्यक्ष प्रमोदसिंह गोतारणेंसह कैलास कदम, सुनील आरगडे, जगदीश मोहिते, मनोज मोरे, अनिल पवार, अविनाश कोतमिरे, बाळासाहेब सरवदे, बाबजी भोंग,बापू भोसले, शकुंतला मखरे ड.समीर मखरे , पक्षाचे कार्यकर्ते, संस्थेतील कर्मचारी, महिलावर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन नानासाहेब सानप, आभार आझाद सय्यद यांनी मानले.

# शेतकऱ्यांच्या सोयीसाठी करमाळ्यात केळी संशोधन केंद्र सुरू करण्याची : आ. रणजीत सिंह मोहिते पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : केळीच्या विविध जाती लागवडीचे तंत्रज्ञान रोग किडनीचे व्यवस्थापन शिक्षण प्रशिक्षण या दृष्टीने अभ्यास आणि उपाययोजना करण्यासाठी केळी संशोधन केंद्राची गरज आहे त्यासाठी करमाळा तालुक्यातील शेळगाव येथे केळी संशोधन केंद्र सुरू करावे असे लक्ष विधी द्वारे मागणी आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील यांनी विधान परिषदेमध्ये केली.

माळी खासदार दहशिल मोहिते पाटील यांनी केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्याच्या केळी निर्यात क्षेत्रात समावेश करून घेतला आहे गेल्या वर्षी महाराष्ट्रात १२ लाख ४३ हजार ८९९ मेट्रिक टन केळीची निर्यात होऊन या या मागील सुमारे आठ लाख २६ हजार ३२२ मेट्रिक टन केळी सोलापूर जिल्ह्यात निर्यात झाले आहे राज्यातून होणाऱ्या निर्यातीत सोलापूरचा वाटा सुमारे ६६.४३% होता त्यासाठी शेतकऱ्यांच्या सोयीसाठी सुलभता येण्यासाठी केळी संशोधन केंद्र करमाळ्यात सुरू करण्याची मागणी विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केले आहे..

# रिपाइं तुळजापूर तालुकाध्यक्षपदी अरुण लोखंडे तर युवक तालुकाध्यक्ष पदी शुभम कदम बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील व केंद्रिय सामाजिक न्याय मंत्री नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालिल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची तुळजापूर तालुकास्तरीय बैठक नळदुर्ग ता. तुळजापूर येथील एस.के.फंक्शन हॉल मध्ये अनंत्य खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली असून या बैठकीत रिपाइं (आठवले ) पक्षाच्या तुळजापूर तालुका अध्यक्ष पदी कार्यकर्ते अरुण नारायन लोखंडे यांची बिन विरोध निवड करण्यात आली.तर तुळजापूर शहर अध्यक्ष पदी वैजिनाथ पांडागळे, युवक तालुकाध्यक्ष पदी शुभम कमलचंद कदम यांची निवड करण्यात आली तसेच तालूका व जिल्हा कार्यकारणीच्या इतर पदाधिकारी ही निवडण्यात आले.

रिपाइं (आठवले) चे महाराष्ट्र प्रदेश जाइंट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तर धाराशिव जिल्हा अध्यक्ष विद्यानंद बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली व



रिपाइं मराठवाडा विभाग कार्यकारणी सदस्य दुर्वास बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, रणजीत बप्पा गायकवाड, जिल्हा सचिव एस. के. गायकवाड,बाबासाहेब मस्के, गुरुवर्य कैलास गवळी गुरुजी यांच्या प्रमुख उपस्थितीत (दि.१०) जुलै गुरुवार रोजी नळदुर्ग येथिल एस.के.फक्शंन हॉल येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची तालुकास्तरिय महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

या बैठकीत पक्षाची तालूका कार्यकारणीची निवड, अगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषदा आदी स्थानिक संख्येच्या सार्वत्रिक निवडनुका,पक्ष बांधणी, पक्षाची सदस्य नोंदणी सह विविध विषयावर चर्चा होऊन पक्षाच्या


## नळदुर्ग येथे रिपाइंची जिल्हा बैठक संपन्न

तालूका कार्यकारणीसह इतर पदाभिकारी यांची निवड करणात आली.

यावेळी रिपाइं (आठवले) तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे, तालुका उपाध्यक्ष महादेव कांबळे, किशन पांडागळे, तालूका सचिव सुरेंद्र सुर्यवंशी, तालूका संघटक सुरेश लोंढे, तालुका संघटन सचिव दत्ता बरसोडे, तुळजापूर शहराध्यक्ष वैजिनाथ पांडागळे, नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे,युवा आघाडी तालुका अध्यक्ष शुभम कदम, तालुका उपाध्यक्ष अजय दुपारगुडे, युवा आघाडी तालुका सरचिटणीस प्रदिप सिरसाट, आदींची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश स्कुलचे मुख्य प्रवर्तक तथा संस्थापक मारुती खारवे यांनी केले. तर धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के,जिल्हा संघटन सचिवपदी प्रताप कदम, जिल्हा कोषाध्यक्षपदी बाबुराव बनसोडे, जिल्हा सचिव एस. के. गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे आदींची निवड करण्यात आली आहे.

याप्रसंगी बैठकीला मार्गदर्शन करताना राजाभाऊ ओव्हाळ म्हणाले की रिपब्लिकन पक्ष हा डॉ.बाबासाहेब यांच्या संकल्पनेतील आणि केंद्रिय सामाजिक न्याय मंत्री नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील पक्ष असून कार्यकर्त्यानी पक्षासी एकनिष्ठ राहून प्रमाणिकपणे काम करावे. पक्ष विरोधी कारवाई करणाऱ्या कार्यत्यांची गय केली जाणार नाही. अगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका संपूर्ण ताकतीनीसी लढण्याची तयारी ठेवा. असे आवहान ही शेवटी त्यानी केले. तर जिल्हा अध्यक्ष विद्यानंद बनसोडे यानी नुतन पदाधिकारी यांचे आभिनंदन करून शुभेच्छा देवून आपण कार्य कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबिर पणे उभे राहणार असल्याचे सांगीतले. याप्रसंगी रिपाइंचे नळदुर्ग शहर अध्यक्ष मारूती खारवे, देवानंद लोंढे, जमभीम वाघमारे, अंबादास डावरे, संभाजी डावरे, मधुकर डावरे, बाबा कदम, तानाजी उमाजी कदम, दिपक वाघमारे, दिगंबर वाघमारे, आरविंद लोखंडे, अशिष जाधव, बाबा कांबळे, किरण गायकवाड सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी गुरु पोर्णिमेचे औचित्य साधुन गुरुवर्य कैलास गवळी गुरुजी यांचा पक्षाच्या वतिने सत्कार करण्यात आला. या बैठकीचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन एस.के.गायकवाड यानी केले.

# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची बदनामी थांबवण्यासाठी दहा लाखाची खंडणी घेताना ॲड. किरण घोडके याला अटक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची बदनामी थांबवण्यासाठी राजनीती घोडके अल्पावधीतच लोकप्रियता मिळवलेला कामगार नेत्याला दहा लाख रुपयांची खंडणी घेताना केबी पी कॉलेज चौकातील नामांकित रादेश हॉटेलमध्ये पंढरपूर शहर पोलिसांनी रंगेहात पकडून गजाआड केले सबंध जिल्ह्यातील कामगार चळवळीतील खळबळ उडाली आहे.

संबंधित माहिती अशी की या कारखान्याची चेअरमन आमदार अमित पाटील यांनी दोन वर्षे बंद पडलेला व शेतकरी व शेतकऱ्यांचा राजवाडा सभासदांची देणे थकलेली व श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा शेतकऱ्यांचा राजवाडा समजला जाणारा सत्ताधारी यांच्याकडून कारखान्याच्या निवडणुकीत आपल्या ताब्यात घेऊन एक हाती सत्ता मिळवली व तो चांगल्या पद्धतीने चालवून दाखवला व सर्व सभासद ऊस बिले व ट्रॅक्टर मालकांची बिले व सेवानंद कामगार यांची सर्व थकीत देणे देऊन कारखाना सध्या सद्यस्थितीत आणला व चांगला प्रकारे आणला व चालत असताना श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यात डाग लावण्याची काम काही मंडळी अजून करत असल्याचे सर्वसामान्य समाजाकडून बोलले जात आहे. मागील काही काही दिवसांपूर्वी पंढरपूर तालुक्यातील कामगार नेता म्हणून वावरत असणारा अनवलीतील किरण घोडके याचे डोळे चांगला चालत असलेला कारखान्याकडे बघून विसरले व त्याला एक कल्पना सुचली व कामाला हायजॅक करण्याची आपण नेता होण्याची विठ्ठल सहकारी साखर कारखान्यात भ्रष्टाचार झाला आहे व कामगारांची पगार थकले आहेत व मी तुमचे सगळे पैसे मिळवून देतो असे सांगत त्यांनी संबंध नाराज कांबरांना संघटित करून थांबारांच्या थकीत पगारासाठी पुणे येथील साखर आयुक्त कार्यालय समोर येथे सेवानिवृत्त कर्मचारी व कामगारांसह उपोषणाला बसला होता व त्याचबरोबर उपोषण सुरू केले होते व अचानक त्यांनी उपोषण बंद केले त्याचेही आंदोलनामुळे आमदार अभिजीत पाटील यांच्या ताब्यात असलेला श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना कामगारांच्या पगारामुळे नाहक बदनाम होत होती त्याला आपण सोलापूर जिल्ह्यातील कामगाराचा नेता झाल्याचे नशा चढली होती व त्यामुळे तो हवेत वावरत असल्याचे दिसून येत होते व त्यांनी शिवाजी चौकातील आपली डिजिटल लावून सोलापूर जिल्ह्यातील कामगार नेता असले की त्याला बास्वत होता व येना जाणाऱ्या लोकांचा त्या डिजिटल कडे लक्ष वेधले जात होते.

सध्या श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या विरोधातील बसलेली उपोषण थांबवतो असा पेशाने वकील असणाऱ्या घोडके यांनी निरोप आपल्या विश्वासू कार्यकर्त्यामार्फत आमदार अभिजीत पाटील यांच्या कार्यकर्त्याकडे काही अटीवर पोहोच केला व संबंधित घोडके यांच्या कार्यकर्त्यांनी हा निरोप व्यवस्थित आमदार अभिजीत पाटील यांच्या कार्यालयाकडे पोचवल्यानंतर देणे घेण्याचे आर्थिक बोलणे झाले व यातील काही रक्कम टोकन म्हणून घोडके यांना देण्याचे ठरले गुरुवारी दिनांक १० रोजी सायंकाळी आठच्या दरम्यान आमदार पाटील यांचे कार्यकर्ते किरण घोडके हे दहा लाखाची रक्कम घेण्यासाठी हॉटेल राधेश बसले होते यावेळी अँड किरण घोडके यांना दहा लाखाची रक्कम ठरल्याप्रमाणे सुपूर्त करण्यात आली परंतु घड्याळाचे काटे उलटे फिरले व गोरगरीब सेवानिवृत्त कामगारांच्या डोळ्यात धुळफेकरून तोंडातील घास फिरवून घेणाऱ्या वकील किरण घोडके याला निसर्गाने माफ केले व कामगारांच्या जीवावर नेता होण्यासाठी गेलेल्या घोडके याला दहा लाख रुपयेची खंडणी स्वीकारताना लाचलुपत विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडून त्याला गजाआड केले. त्यामुळे पंढरपूर शहर व तालुक्यातील मोठी खळबळ उडाली आहे वकील किरण घोडके यांच्यावर पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

कमरांचा विश्वासघात केल्याची कारखान्यातील सेवानृत्य कर्मचाऱ्यांना कळताच त्यांनी त्याचा जाहीर निषेध केला व त्याच्याविषयी कामगारांची नाराजी व्यक्त केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### मुतखड्याचे औषध घेण्याकरिता जाताना अपघात; अज्ञात रिक्षा चालकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : मुतखड्याचे औषध घेण्याकरिता जात असताना अज्ञात रिक्षाचालकाने फिर्यादी यांच्या दुचाकीला धडक देऊन गंबीर दुखापत करत जखमी केल्याप्रकरणी अज्ञात रिक्षाचालका विरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी हौसेदार नामदेव ढंगे (वय-५२,रा.मंगळवेढा) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.ही घटना ३ जुलै रोजी शिवाजी चौक ते जुना पुना नाका येथे घडली. माहिती अशी की, फिर्यादी व फिर्यादीचा मित्र सत्यवान शिल्लेदार असे दोघेजण दुचाकी क्रमांक एमएच.१३.डीसी.३११६ वरून मंगळवेढा येथून सोलापूर मार्गे लातूरला मुतखडा आजाराचे औषध घेण्याकरिता जात असताना फिर्यादी यांच्या जाण्याच्या मार्गावर समोर एका अज्ञात रिक्षा आली व त्या रिक्षाचालकाने फिर्यादी यांच्या दुचाकीला धडक देऊन जखमी केले तसेच रिक्षाचालक न थांबता भरधाव वेगात निघून गेला आहे.या धडकेत फिर्यादी यांना व तसेच फिर्यादीच्या मित्राला देखील गंभीर दुखापत झाली आहे. तपास पो. ह. कसबे हे करीत आहेत.

### जेवणाचे पार्सल घेण्यासाठी जाताना एकास रिक्षाची धडक

सोलापूर, (प्रतिनिधी) : जेवणाचे पार्सल घेण्यासाठी जात असताना अज्ञात रिक्षाचालकाने एकास धडक देऊन शिवीगाळ केल्याप्रकरणी अज्ञात रिक्षा क्रं.एमएच.१३.ईएफ.०६७९ यातील चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी संदीप शशिकांत जाधव (वय-४१-,रा.वसंत विहार) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. माहिती अशी की, फिर्यादी हे त्यांच्या ताब्यातील वाहन क्रमांक एमएच.१३.ईएम.००१२ या वाहनावरून मंगळवार पेठ येथे जेवणाचे पार्सल घेण्यासाठी जात असताना फिर्यादी हे अन्नपूर्णा लंच होम समोर आले असता, वरील क्रमांकाच्या रिक्षाचालकाने फिर्यादी यांना धडक देऊन जखमी झाले. तसेच रिक्षा चालकाने फिर्यादी यांना शिवीगाळ करून मारण्यास अंगावर येऊन तेथून निघून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.तपास पोलीस हवालदार रुपनर हे करीत आहेत.

# पावसाळी अधिवेशनाचे कामकाज १८ जुलैपर्यंत



## विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन कामकाज १८ जुलैपर्यंत होणार आहे. अधिवेशन कामकाजाच्या नियोजनासाठी आज विधानभवन येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली.

या बैठकीस विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, तसेच सदस्य भास्कर जाधव, नितीन राऊत, जितेंद्र आव्हाड, अमीन पटेल, भाई जगताप, प्रविण दरेकर, प्रसाद लाड व संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पावसाळी अधिवेशनातील कामकाजाची रूपरेषा, चर्चा आणि शासकीय विधेयकांच्या मांडणीसंदर्भातील नियोजनावर चर्चा झाली. विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांनी कामकाजासंदर्भात सविस्तर माहिती दिली.

निरंतर ध्यास' अहवालाचे प्रकाशन

बैठकीनंतर आमदार ड.निरंजन डावखरे यांच्या 'निरंतर ध्यास' या विशेष अहवालाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करण्याचा ऐतिहासिक पराक्रम

ठाणे परिवहन सेवेतील पोलीस अधिकारी श्रीमती द्वारिका भागीरथी विश्वनाथ डोखे यांनी ५४ दिवसांत माऊंट एव्हरेस्ट सर करत महाराष्ट्र पोलिस दलात इतिहास रचला आहे. ३० मार्च २०२४ रोजी त्यांनी मोहिमेला सुरुवात केली आणि २२ मे रोजी जगाच्या सर्वोच्च शिखरावर भारताचा तिरंगा फडकवला. श्रीमती डोखे या महाराष्ट्र पोलीस दलातील माऊंट एव्हरेस्ट सर करणाऱ्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. विशेष म्हणजे, माउंट एव्हरेस्टवर भारताचे राष्ट्रगीत 'जन गण मन' सादर करणाऱ्या त्या देशातील पहिल्या महिला गिर्यारोहक ठरल्या आहेत. यासोबतच त्यांनी जगातील चौथ्या क्रमांकाच्या उंच शिखर असलेल्या 'माऊंट ल्होत्से' (८५१६ मीटर) देखील यशस्वी सर केला आहे.

आई-वडीलांच्या स्मृतीस वेगळ्या प्रकारे श्रद्धांजली वाहण्याच्या उद्देशाने त्यांनी ही धाडसी मोहीम स्वीकारली होती. त्यांच्या या यशामुळे महाराष्ट्र पोलीस दलाच्या शौर्य, धैर्य आणि नारीशक्तीचे प्रतीक म्हणून त्यांचं कौतुक मान्यवरांनी केले..

इंग्लिश खाडी पार करणाऱ्या ठाण्यातील जलतरणपटूंचा ऐतिहासिक पराक्रम

ठाणे जिल्हा ॲमॅच्युअर ॲक्वाटिक असोसिएशनच्या तीन जलतरणपटूंनी अलीकडेच इंग्लंड ते फ्रान्स दरम्यानची ४६ कि.मी. अंतराची इंग्लिश खाडी यशस्वीरित्या पार केली. मानव राजेश मोरे याने १३ तास ३७ मिनिटांत, आयुष प्रवीण तावडे आणि आयुषी कैलाश आखाडे यांनी ११ तास १९ मिनिटांत ही मोहीम यशस्वी केली.

विशेष उल्लेखनीय म्हणजे, रेयांश दीपक खमकर या अवघ्या सहा वर्षांच्या बालकाने तब्बल १५ कि.मी. अंतर पोहत पार करत देशात विक्रम केला. त्याची नोंद 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये झाली असून त्याचाही यथोचित मान्यवरांनी गौरव केला.

या सर्व यशस्वी व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात गुरुवंदन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सौ सुरेखा कल्याणशेट्टी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने गुरुपौर्णिमा निमित्त शाळेत विविध उपक्रम घेण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी उपस्थित होते. यावेळी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी सप्तऋषी ची महती सांगून,जीवनामध्ये गुरूंचे महत्त्व काय याविषयी बोलताना गुरुशिवाय मोक्ष नाही, गुरुशिवाय दिशा नाही, ईश्वर प्राप्तीसाठी गुरूंची आवश्यकता आहे, गुरूंचा आदर सन्मान ठेवावा , प्रत्येकाने गुरूंच्या सानिध्यात राहून जीवन व्यतीत करावे असे ते म्हणाले.

यावेळी कु.कोमल कोरे, कु कावेरी गवंडी, कु साक्षी चौगुले, कु आलिया वळसंकर, कु श्रद्धा बाबर व कु सृष्टी चव्हाण या विद्यार्थीनीनी आपल्या मनोगतातून शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केले, कु सिद्धी बाबर, कु सुरेखा सोलनकर, कु पल्लवी सोलनकर, कु साक्षी केंगारे, कु ऐश्वर्या बिराजदार, कु रूपा ऐवळे व कु वैष्णवी पाटील या मुलीनी समुहगीत सादर केले. तर कन्नड माध्यमचे उमेश पाटील, सिद्धाराम मणे, आकाश हनम शेट्टी या मुलानी गुरुवंदन नृत्य सादर केले.

सुत्रसंचालन विद्यार्थीनी कु.प्रीती फुलारी हीने केली, प्रास्ताविक कु स्नेहा देडे हीने तर उपस्थितांचे आभार कु. दानेश्वरी बगले हीने मानले.

या कार्यक्रमास पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, श्रीदेवी मायनाळे, रविकिरण दंतकाळे, बाबूशा मंगरुळे, सिद्रामप्पा पाटील, कुमार जाधव, राजकुमार गवळी, कल्पना स्वामी, दीपक गंगोंडा, मनीषा दूधभाते, सागर मठदेवरु, निशिगंधा कोळी.आरती थोरात, विद्या बिराजदार, विद्याश्री वाले आदी शिक्षक उपस्थित होते.

# गुरु शिवाय ज्ञान नाही, ज्ञानाशिवाय मान नाही : शरद घुले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




सिन्नर प्रतिनिधी :जनता विद्यालय कोमलवाडी येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यातआली. गुरु शिवाय नाही, ज्ञाना शिवाय मान नाही. असे गुरुपौर्णिमा निमित्त कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलताना शालेय समितीचे अध्यक्ष शरद घुले यांनी सांगितले.

विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे नियोजन केले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा उगले व तनुजा सैद यांनी केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक यांनी आपल्या मनोगतातून पौराणिक काळापासून असलेले गुरुचे महत्व पटवून सांगितले. सान्वी जोरी या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा पुष्पगुच्छ व रुमाल देऊन सत्कार केला. सुनील गोसावी, गोकुळ सैद, तुषार भोर, गीता कासार ,लक्ष्मी आहेर या विद्यार्थ्यांनी भाषणे केली.तसेच सार्थक घुले यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक सचिन गिते, केशव वळवी,सागर भदाणे ,मनीषा गोराडे, स्वाती जोंधळे, चित्रा बाजारे, ऋतुजा वाघ, शितल रायते, कीर्ती गवारे, सागर बस्ते,सुदर्शन गांडुळे ,सौरभ कमानकर,शरद टेमगर यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# अनंत चैतन्य प्रशालेत गुरु वंदना कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी

गुरुपौर्णिमा म्हणजे आपल्यातील अज्ञानाचा अंधकार दुर करणाऱ्या, सन्मार्ग दाखवणाऱ्या गुरू विषयी आदरभाव व्यक्त करण्याचा दिवस. याचेच औचित्य साधून आज महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य. व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे गुरूवंदन कार्यक्रम अत्यंत कृतज्ञतेच्या भावनेने साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम कु.श्रावणी हताळे (इ.१०वी.) हिने उपस्थित सर्व गुरूजनांचे शब्दसुमनांनी स्वागत करुन आजच्या कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. यानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांच्या हस्ते सदगुरु श्री. स्वामी समर्थ व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पांजली अर्पित करण्यात आली. यानंतर प्रशालेच्या सर्व गुरुजनांना इ.१०वी विद्यार्थ्यांच्या वतीने गुलाबपुष्प व गुरुदक्षिणा स्वरूपात पेन देऊन गुरूवंदन करण्यात आले. यावेळी कु. मानसी तळवार ( इ. ५वी), कु. दिव्या निकम, उत्कर्ष जमादार( इ. ८वी) व कु. श्रृती बाळशंकर ( इ. ९वी) यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.अशोक साखरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे,सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. अप्पासाहेब काळे, जेष्ठ शिक्षक श्री. सरदार मत्तेखाने,श्री. सुरेश जाधव,श्री. धनंजय जोजन, प्रा.रवींद्र कालीबत्ते, प्रा. काशीनाथ पाटील , श्री. शशिकांत अंकलगे, सौ.मल्लमा चप्पळगाव, सौ. स्वप्नाली जमदाडे व समस्त शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. लक्ष्मी घोडके (इ.१०वी) हिने तर आभार कु. गीतांजली बिराजदार ( इ. १० वी.) हिने मानले. प्रशालेत साजरा केले गेलेल्या या सुंदर अशा कार्यक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे संचालक व मार्गदर्शक मा. श्री.मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ मा. श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी , संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी कौतुक केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

# बदलत्या सकारात्मक विचारधारेचा युवा धोरणात समावेश परिवर्तन घडवेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : विकसित भारत २०४७ च्या दृष्टीने सुधारित युवा धोरणाची आखणी करावी. नव्या आव्हानांना सामोरे जाणाऱ्या युवकांच्या बदलत्या विचारसरणीचा समावेश युवा धोरणात केल्यास परिवर्तन शक्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

विधानभवन येथे राज्याच्या सुधारित युवा धोरणासाठी गठित समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा समितीचे अध्यक्ष दत्तात्रय भरणे, आमदार अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, संतोष दानवे, राजेश पवार, आशुतोष काळे, प्रवीण दटके, देवेंद्र कोठे, सुहास कांदे, डॉ. बाबासाहेब देशमुख, प्रकाश सुर्वे, वरुण सरदेसाई, रोहित पाटील, युवा बिरादरीचे संस्थापक पद्मश्री क्रांती शाह, आयुक्त शीतल तेली तसेच राज्य व राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार विजेते उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, युवकांचे विचार, त्यांच्या अपेक्षा समजून घेत धोरण आखले गेले तर ते समर्पक ठरेल. शहरी व ग्रामीण भागातील युवकांना समान संधी मिळावी यासाठी प्रशिक्षण, सुविधा आणि योजनांचा समावेश असलेले समतोल धोरण तयार करणे आवश्यक आहे. युवक कल्याण विभागाबरोबरच अन्य विभागांनीही हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये, सोशल मीडिया आणि सेवा क्षेत्रातील प्रतिनिधींनाही धोरणात सहभागी करून त्यांच्या सूचना समाविष्ट करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी आज दिले. बैठकीत आमदार आणि निमंत्रित सदस्यांनीही सूचना मांडत समृद्ध धोरणासाठी योगदान दिले.

यावेळी क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन विविध उपक्रम राबवित आहे. शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील युवकांच्या गरजा ओळखून, देश-विदेशातील युवकांबाबतच्या धोरणांचा अभ्यास करून, प्रत्यक्ष संवादातून उपाययोजना आखल्या जातील.

नवे सुधारित युवा धोरण यामध्ये शिक्षण, रोजगार, उद्योजकता, बौद्धिक व सामाजिक विकास, स्टार्टअप, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ख) याबरोबरच जबाबदारीची जाणीव, राष्ट्रप्रेम, नेतृत्वगुण रुजवणे यावर भर दिला जाणार आहे. यासाठी राज्य व जिल्हास्तरावरील योजना, युवा प्रशिक्षण केंद्र, युवा पुरस्कार, वसतिगृहे, महोत्सव, व्यक्तिमत्व विकास उपक्रम, युवा निधी आणि युवा प्रतिष्ठा निर्देशांक आदी बाबींचा समावेश केला जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# जि. प. माळकरंजा शाळेत गुरुपौर्णिमा साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधि : गुरुपौर्णिमा अर्थात व्यास पौर्णिमेच्या निमित्ताने जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा येथे गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री शरद गालट हे तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील मुख्याध्यापक श्री संतोष भोजने हे उपस्थित होते. यावेळी नागझरवाडी येथील विद्यार्थी श्री ऋषिकेश साळुंखे याने श्री संतोष भोजने सर यांनी नागझरवाडी येथे केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडत असे शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना लाभावे असे सांगितले. सहशिक्षक श्री हनुमंत घाडगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आपण केवळ चार भिंतीच्या आड शिकवणारेच आपले गुरु असतात असे नाही, तर जीवन जगत असताना आई-वडील ,शाळेतील शिक्षक आणि समाज हे आपले सर्वच गुरु आहेत. निसर्गातील विविध पशु, पक्षी, प्राणी आणि वनस्पती झाडे, वेली हे सुद्धा आपल्याला अनेक धडे देत असतात. यातूनही आपण शिकलो पाहिजे आणि त्यांना गुरु मानले पाहिजे असे यावेळी सांगितले. कार्यक्रमास शाळेतील सहशिक्षिका श्रीमती भारती सूर्यवंशी, युवा प्रशिक्षणार्थी कुमारी मंजुश्री कराड,मकरंद नाडे यांच्यासह गावातील नागरिक श्री महेश लोमटे रत्नदीप लोमटे लालासाहेब शितोळे यांच्यासह नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थित विद्यार्थ्यांना श्री. ऋषिकेश साळुंखे यांनी आणलेला खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.